# फ्लिपकार्टने आपल्या किराणा व्यवसायात केली वाढ, भारतभरातील ५० हून अधिक शहरांमध्ये विस्तार

- *फ्लिपकार्ट मार्केटप्लेसवरील किराणा आता कोलकाता, पुणे, अहमदाबाद, जयपूर, चंदीगढ आणि मैसुर अशा शहरांमध्ये उपलब्ध*
- *पुढील सहा महिन्यांत ७० हून अधिक शहरांमध्ये विस्ताराची योजना*
- *किराणा व्यवसायातील वृद्धीमुळे अन्नप्रक्रिया उद्योग, शेतकऱ्यांशी संबंधित बाजारपेठेला चालना*

**बंगळुरू - २ मार्च २०२० :** फ्लिपकार्ट या भारतातील अंतरदेशीय बाजारपेठेने आपल्या भारतभरातील मार्केटप्लेसच्या माध्यमातून किराणा सेवेचा विस्तार ५० हून अधिक शहरांमध्ये केला आहे. यामुळे सात महानगरे आणि आसपासच्या ४० हून अधिक शहरांमधील वापरकर्त्यांना उच्च दर्जाचे किराणा सामान सर्वोत्कृष्ट बचत आणि सवलती, वेगवान डिलिव्हरी आणि किराणा खरेदीच्या सर्वाधिक सहजसोप्या अनुभवासह उपलब्ध होणार आहे.

गेल्या काही वर्षांत फ्लिपकार्टने आपल्या किराणा सामान सेवेच्या वेगवान वृद्धीसाठी गुंतवणूक केली आहे आणि मागील वर्षभरात या व्यवसायाची व्याप्ती लक्षणीय प्रमाणात वाढवली आहे. या वृद्धीमुळे कोलकाता, पुणे आणि अहमदाबाद यांसारख्या महानगरांमधील वापरकर्त्यांना फ्लिपकार्टच्या खास फुलफिलमेंट सेंटर्ससह फ्लिपकार्टची वाणसामान सेवा वापरण्याची सोय उपलब्ध झाली आहे. फ्लिपकार्टने सॅटेलाइट-एक्स्पान्शन मार्केटप्लेस मॉडेलच्या माध्यमातून आपली ही सेवा मैसुर, कानपूर, वारांगल, अलाहाबाद, अलिगढ, जयपूर, चंडिगढ, राजकोट, बडोदे, वेल्लोर, तिरुपती आणि दमण अशा शहरांमध्येही सुरू केली आहे.

या जागतिक महासंकटामुळे लाखो लोक ई-कॉमर्सकडे वळले आणि यातील सोय तसेच डिजिटल व्यवहारांमधील सहजतेचे त्यांनी कौतुक केले. यामुळे ग्राहकांकडून येणाऱ्या ई-ग्रोसरीच्या मागणीतही भरीव वाढ झाली. ही वाढ फक्त महानगरांमध्ये नाही, तर द्वितीय श्रेणी शहरे आणि त्या पलिकडेही आहे.

**फ्लिपकार्टच्या ग्रोसरी, जनरल मर्कंडाइज अ‍ॅण्ड फॅर्निचर विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनिष कुमार** म्हणाले, "*वापरकर्त्यांकडून दर्जेदार अन्न आणि घरगुती सामानाची मागणी वाढत असल्याने किराणा विभाग सातत्याने आणि सर्वाधिक वेगाने वाढतो आहे. याचमुळे आम्ही देशभरात आमच्या किराणा व्यवसायाला अधिक चालना देण्यासाठी, परिसंस्थात्मक भागीदारीला बळकटी देणारी गुंतवणूक केली आहे. यामुळे ग्राहकांना व्यापक उत्पादन श्रेणी, दमदार पुरवठा साखळी आणि इन-अ‍ॅप उत्तम अनुभव मिळण्याची खातरजमा होते. मागील वर्षभरात द्वितीय श्रेणी शहरांतील किराणा सामानाची मागणी वाढत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. यात आपल्या घरातूनच आरामात संपर्करहित खरेदी करण्याला ग्राहक*

*प्राधान्य देत असल्याची भर पडली. आमच्या मते हा ट्रेंड कायम राहील आणि आम्ही भारतात ई-ग्रोसरीसाठी नवा मार्ग आखू."*

आजघडीला फ्लिपकार्ट ग्रोसरीवर २०० हून अधिक विभागांमध्ये ७००० हून अधिक उत्पादने उपलब्ध आहेत. यात दैनंदिन घरगुती वस्तू - पीठ, डाळी, तेल, तूप, नाश्ते, सरबते, कन्फेक्शनरी, पर्सनल केअर, डेअरी आणि अंडी आणि इतर अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. ऑनलाइन खरेदीत वाणसामान हा येत्या काळातील फार मोठा विभाग असणार आहे आणि नव्या ग्राहकांना ऑनलाइन आणण्यावर फ्लिपकार्टचा मुख्य भर असेल. कंपनीच्या ग्रोसरी व्यवसायामुळे स्थानिक अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल, शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाधारित बाजारपेठेच्या माध्यमातून लाखो ग्राहकांपर्यंत पोहोचता येईल. मागील वर्षभरात फ्लिपकार्ट ग्रोसरीमध्ये तीन पट वाढ झाली आहे. भारतातील एक सर्वात व्यापक कंपनी म्हणून फ्लिपकार्ट ग्रुप देशभरातील अनेक शेतकरी/फार्मर्स प्रोड्युसर ऑर्गनायझेशन्ससोबत काम करून त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी त्यांना सुनियोजित कृषी पुरवठा साखळीशी जोडते. फ्लिपकार्ट ग्रोसरीने जागतिक महासंकटात ग्राहकांना सेवा देण्यासाठी आघाडीच्या रीटेलर्ससोबत भागीदारी केली आहेच. त्याचप्रमाणे, देशभरातील एफपीओजसोबत काम करून शेतकरी समुदायाला योग्य डिजिटल ॲक्सेसही मिळवून दिला आहे.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या रेडसीअर कन्स्लटिंग अहवालानुसार भारतातील ५० टक्क्यांहून अधिकची (सुमारे ५७० अब्ज डॉलर्स) किराणा रीटेल बाजारपेठ ई-ग्रोसरी व्यासपीठांना काबीज करता येईल. यातून मूल्याला प्राधान्य घरगुती उत्पादनांचा वाटा लक्षणीय असा ६१ टक्के आहे. यातील ४० टक्के संधी महानगरे आणि प्रथम श्रेणी बाजारपेठेत आहेत.

फ्लिपकार्टच्या ग्रोसरी विभागात अनोख्या ऑन-टाइम डिलिव्हरीला दमदार पुरवठा साखळी, व्यापक श्रेणीतील उत्पादनांची उपलब्धता आणि खरेदीचा मूळ, अस्सल अनुभवाची जोड देण्यात आली आहे. किराणासाठी फ्लिपकार्टची व्हॉइस-एनेबल्ड खरेदी, क्रेडिटचे लाभ आणि ओपन बॉक्स डिलिव्हरीज यामुळे लाखो ग्राहकांना वाणसामान खरेदीचा अत्यंत सहजसुंदर अनुभव मिळतो. फ्लिपकार्टने 'फ्लिपकार्ट क्विक' ही सेवा सुरू केली आहे. या पद्धतीतून बंगळुरूमध्ये ९० मिनिटांत डिलिव्हरी केली जाते.

फ्लिपकार्टने नुकत्याच आपल्या किराणा व्यवसायासाठी नवी भारतभरातील मोहीम सुरू केली आहे. ग्राहकांच्या निर्णयांवर कसला परिणाम होतो आणि दैनंदिन किराणासामान घेताना त्यांना कोणत्या अडचणी येतात, याचा सखोल अभ्यास करून ही मोहीम आखण्यात आली आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150

million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**